**कालमर्यादा / अत्यंत तातडीचे**

क्र.पोमसं/३/११/६/निवडसमिती-२०१६-१७/३२/१७

**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**

शहीद भगत सिंह मार्ग, कुलाबा, मुंबई-०१

दिनांक:- ०५/१०/२०१७.

**विषय:-** निःशस्त्र पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नतीसाठी महसुली संवर्गाची माहिती पाठविण्याबाबत.

------o-----

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एस्आर्व्ही-०२१५/प्र.क्र.१५६/कार्या-१२, दिनांक २८/०४/२०१५, दिनांक १६/०७/२०१५ (सुधारणा) व दिनांक १५/०६/२०१७ (दुसरी सुधारणा) अन्वये शासनाने महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली संवर्ग वाटपासाठी अधिसूचना निर्गमीत केल्या आहेत. सदरची अधिसूचना व त्यावरील ०२ सुधारणा ह्या महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

सोबत नमुना प्रपत्र-१ व प्रपत्र-२ जोडले आहे. नमुना प्रपत्र-१ मध्ये निःशस्त्र पोलीस निरीक्षक पदाची महसुल विभागनिहाय रिक्त पदांची सद्यःस्थिती दर्शविण्यात आली असून, सदरची सद्यःस्थिती संबंधीत निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावी व **सोबतच्या यादीतील निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांकडून नमुना प्रपत्र-२ "बंधपत्र" भरुन घेण्यात यावे. त्यासाठी उपरोक्त नमूद दिनांक २८/०४/२०१५, दिनांक १६/०७/२०१५ व दिनांक १५/०६/२०१७ च्या अधिसचूनांमधील तरतुदी सोबतच्या यादीतील निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. तसेच, महसुली विभाग वाटप (दुसरी सुधारणा)-२०१७ मधील नियम-६ अन्वये जी प्रकरणे वगळण्यात आली आहे. ती प्रकरणे ज्या अधिकाऱ्यांना लागू होतात त्यांनी त्यासंबंधीची आवश्यक ती कागदपत्रें (प्रमाणपत्रे) बंधपत्रासोबत जोडून सदरची बंधपत्रें संबंधीत निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांकडून पूर्णतः भरुन घेऊन सदरची बंधपत्रे या कार्यालयातील कार्यासन क्रमांक ३ च्या** desk3.dgoffice@mahapolice.gov.in **या ई-मेल आय.डी. वर दिनांक १०/१०/२०१७ पूर्वी पाठवावीत.**

**विशेषीकृत अभिकरण शाखा उदा. ए.सीबी. / रा.गु.वि. / गु.अ.वि. / महामार्ग सुरक्षा पथक / नागरी हक्क संरक्षण / विशेष सुरक्षा विभाग / दहशतवाद विरोधी पथक यांचे मुख्यालय ज्या ठिकाणी आहेत त्या संवर्गात त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर विशेषीकृत अभिकरण शाखेची घटक कार्यालये संपूर्ण महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे विशेषीकृत अभिकरण शाखेमध्ये नेमणूक झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांची महाराष्ट्र पोलीस दलात कोठेही नेमणूक होऊ शकते, याची घटकप्रमुखांनी संबंधीत सहायक पोलीस निरीक्षकांना लेखी समज द्यावी.**

नमूद अधिकाऱ्यांनी यापूर्वी सादर केलेली बंधपत्रे रद्दबातल समजण्यात येत आहेत. सर्व अधिकाऱ्यांना नव्याने बंधपत्र देणे बंधनकारक आहे.

**सोबत जोडलेल्या यादीतील नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक हे नि:शस्त्र पोलीस निरीक्षक पदाच्या पदोन्नतीच्या कक्षेत विचाराधीन आहेत. सदरहू यादी ही पदोन्नतीची पात्रता यादी किंवा निवडसूची नसून ती फक्त पदोन्नतीच्या कक्षेत विचाराधीन असलेल्या सहायक पोलीस निरीक्षकांची यादी आहे, याची कृपया नोंद घ्यावी.**

यादीतील ज्या सहायक पोलीस निरीक्षकांच्या सध्याच्या नेमणुकांमध्ये बदल झाला असेल, व ते त्यांच्या अधिपत्याखाली नेमणुकीस नसतील त्या घटकांनी त्या सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या ज्या घटकांत झालेल्या आहेत त्या घटक प्रमुखांना तसे परस्पर स्वतंत्रपणे कळवून तसे या कार्यालयास कळवावे, तसे न केल्यास संबंधीत सहायक पोलीस निरीक्षकांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागेल.

सर्व घटकप्रमुखांना विनंती करण्यात येते की, यादीतील सर्व अधिकाऱ्यांकडून बंधपत्रे प्राप्त करुन विहीत कालावधीत ती या कार्यालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई (सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, म.रा., मुंबई / प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई / गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा., पुणे /
पोलीस आयुक्त, पुणे शहर / अमरावती शहर / औरंगाबाद शहर / नवी मुंबई
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, व्ही.आय्.पी., सुरक्षा, दादर-मुंबई / ना.ह.स., म.रा., मुंबई.
पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद / पुणे ग्रामीण / पालघर / रत्नागिरी / चंद्रपूर / धुळे / अहमदनगर / अकोला / जालना / बीड / भंडारा / सोलापूर ग्रामीण / सांगली / नागपूर ग्रामीण / नांदेड / ठाणे ग्रामीण.
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना.

प्रत,

कार्यासन अधिकारी, का.क्र.४.

२. सोबत जोडलेल्या यादीतील नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांकडून दिनांक ३१/०३/२०१७ अखेरची मत्ता व दायीत्व विवरणपत्रे प्राप्त करुन घेऊन तसे कार्यासन क्रमांक ३ यांना दिनांक १२/१०/२०१७ पर्यंत कळवावे.

## प्रपत्र-१

### विभागीय महसुल संवर्गनिहाय निःशस्त्र पोलीस निरीक्षकांची रिक्त पदांची सद्यःस्थिती.

| अ.क्र. | विभागीय संवर्ग | निःशस्त्र पोलीस निरीक्षकांची रिक्त पदे |
|---|---|---|
| १. | **नागपूर**<br>[नागपूर शहर/ नागपूर ग्रामीण/ चंद्रपूर/ भंडारा/ गडचिरोली/ वर्धा /गोंदिया/ पोप्रकें, नागपूर/ लोहमार्ग-नागपूर/ युबोटीसी-नागपूर/ नविअ-नागपूर/ विपोमनि-नागपूर यांचे वाचक/ अजप्रतस-नागपूर/ अजप्रतस-गडचिरोली/ जिजाप्रतस, क्र.१ / जिजाप्रतस, क्र.३ नागपूर/ जिजाप्रतस, वर्धा / जिजाप्रतस, भंडारा / जिजाप्रतस, गोंदिया / जिजाप्रतस, चंद्रपूर / जिजाप्रतस, गडचिरोली/ बीडीडीएस, नागपूर] | ११ |
| २. | **अमरावती**<br>[अमरावती शहर / अमरावती ग्रामीण / अकोला / बुलढाणा / यवतमाळ / वाशिम / पोप्रकें, अकोला /अजप्रतस, अमरावती / जिजाप्रतस, अमरावती / जिजाप्रतस, यवतमाळ / जिजाप्रतस, अकोला / जिजाप्रतस, बुलढाणा / जिजाप्रतस, वाशिम/ बीडीडीएस, अमरावती शहर] | ११ |
| ३. | **औरंगाबाद**<br>[औरंगाबाद शहर / औरंगाबाद ग्रामीण / बीड / जालना / उस्मानाबाद / नांदेड / परभणी / हिंगोली / लातूर / पोप्रकें, जालना / पोप्रकें, लातूर-बाभळगांव / अजप्रतस, औरंगाबाद / जिजाप्रतस, औरंगाबाद / जिजाप्रतस, बीड / जिजाप्रतस, जालना / जिजाप्रतस, परभणी / जिजाप्रतस, लातूर / जिजाप्रतस, नांदेड / जिजाप्रतस, हिंगोली / जिजाप्रतस, उस्मानाबाद / बीडीडीएस, नांदेड / बीडीडीएस, औरंगाबाद शहर] | १७ |
| ४. | **कोंकण विभागाचा भाग असलेला कोंकण-१**<br>[पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदूर्ग / जिजाप्रतस, रायगड / जिजाप्रतस, पालघर / जिजाप्रतस, रत्नागिरी / जिजाप्रतस, सिंधुदुर्ग] | २ |
| ५. | **नाशिक**<br>[नाशिक शहर / नाशिक ग्रामीण / धुळे / जळगांव / अहमदनगर / नंदुरबार / पोप्रकें, धुळे / मपोअ, नाशिक / डीटीएस, नाशिक / टीआरटीआय, नाशिक / टीआरटीआय, नंदुरबार / जिजाप्रतस, नाशिक / जिजाप्रतस, अहमदनगर / जिजाप्रतस, धुळे / जिजाप्रतस, जळगांव / जिजाप्रतस, नंदुरबार / बीडीडीएस, नाशिक शहर] | १२ |
| ६. | **कोंकण विभागाचा भाग असलेला कोंकण-२**<br>[बृहन्मुंबई / ठाणे शहर / नवी मुंबई / ठाणे ग्रामीण / पोप्रकें, मरोळ / लोहमार्ग, मुंबई / अपर पोमसं, लोहमार्ग-मुंबई / राज्य पोलीस नियंत्रण कक्ष / पोलीस महासंचालक कार्यालय, प्रकल्प सुधारणा / पोमसं कार्यालय, ग्रीव्हीएन्स सेल / राज्य मानवी हक्क आयोग / एस.सी., | १०१ |

| अ.क्र. | विभागीय संवर्ग | निःशस्त्र पोलीस निरीक्षकांची रिक्त पदे |
|---|---|---|
| | एस.टी., कमीशन / अजप्रतस, ठाणे / जिजाप्रतस, ठाणे / ज़िजाप्रतस, मुंबई शहर / जिजाप्रतस, मुंबई-उपनगर / बीडीडीएस, ठाणे शहर/ फोर्स वन / युसीटीसी, फोर्स वन / महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग]<br><br>अेसीबी / रागुवि / मसुप / विसुवि / नाहसं / दविप :- संपूर्ण महाराष्ट्रभर कार्यालये राहतील | |
| ७. | **पुणे**<br><br>[पुणे शहर / पुणे ग्रामीण / सोलापूर शहर / कोल्हापूर / सांगली / सातारा / सोलापूर ग्रामीण / पोप्रकें, खंडाळा / पोप्रकें, नानवीज / मपोप्रकें, सोलापूर / पोप्रकें, तासगांव-सांगली / एमआयए, पुणे / कारागृह, पुणे / लोहमार्ग, पुणे / अजप्रतस, पुणे / जिजाप्रतस, सोलापूर / जिजाप्रतस, कोल्हापूर / जिजाप्रतस, सांगली / जिजाप्रतस, सातारा / जिजाप्रतस, पुणे / बीडीडीएस, पुणे शहर ]<br><br>गुअवि, पुणेः- संपूर्ण महाराष्ट्रभर कार्यालये राहतील. | २६ |
| | **एकूण रिक्त पदे** | **१८०** |